आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१५ मार्च २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- आगामी लोकसभा निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्याकरता केंद्रीय निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद उद्या दुपारी नवी दिल्ली इथं होणार / नवीन निवडणूक आयुक्तांनी पदभार स्वीकारला
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, तामिळनाडू आणि केरळ या राज्यांच्या ५ दिवसांच्या दौऱ्यावर
- आपल्या सरकारने गेल्या अडीच वर्षात पेट्रोलच्या किंमती लीटरमागे १५ रुपयांनी तर डिझेलच्या किंमती १७ रुपयांनी कमी केल्याचं केंद्रीय गृहमंत्र्यांचं प्रतिपादन
- ऑल इंग्लंड खुल्या बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेमध्ये पुरुष एकेरीत भारताच्या लक्ष्य सेनचा उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

**आणि**

- पुढचे पाच दिवस देशाच्या मध्य आणि पूर्व भागात वादळी वाऱ्यांसह मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता

**<><><><><><>**

आगामी लोकसभा निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्याकरता केंद्रीय निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद उद्या दुपारी नवी दिल्ली इथं होणार आहे. काही राज्यांमधल्या विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रमही यावेळी जाहीर होईल. या पत्रकारपरिषदेचं थेट प्रक्षेपण समाजमाध्यमांवर करण्यात येणार असल्याचं निवडणूक आयोगाच्या एक्स समाज माध्यमावर याबाबत माहिती देण्यात आली आहे.

<><><><><>

नवनियुक्त निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि सुखबीरसिंग संधू यांनी आज पदभार स्वीकारला. निर्वाचन सदन या मुख्य निवडणूक कार्यालयात मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी या दोघांचं स्वागत केलं. जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाहीतल्या २०२४ च्या निवडणुकांआधी झालेल्या या नेमणूकांना महत्त्व असल्याचं राजीव कुमार यावेळी म्हणाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालच्या निवडसमितीने ज्ञानेश कुमार आणि सुखबीरसिंग संधू यांच्या नावाची शिफारस केल्यानंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल निवडणूक आयुक्तपदी त्यांची नेमणूक केली.

<><><><><>

केंद्रीय निवडणूक आयोगानं निवडणूक रोख्यांची माहिती आपल्या संकेतस्थळावर प्रकाशित केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार निवडणूक रोख्यांची सर्व माहिती केंद्रीय निवडणूक आयोगाला स्टेट बँकेनं परवा म्हणजे १३ तारखेला दिली. १२ एप्रिल २०१९ ते १५ फेब्रुवारी २०२४ दरम्यान खरेदी झालेल्या आणि वटलेल्या निवडणूक रोख्यांची माहिती बँकेनं दिली आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, तामिळनाडू आणि केरळ या राज्यांच्या ५ दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. तामिळनाडूत कन्याकुमारी इथं विवेकानंद महाविद्यालयाच्या मैदानावर त्यांनी जाहीर सभा घेतली. तमिळनाडूमधे मोठ्या राजकीय परिवर्तनाची चाहूल जाणवत असल्याचं त्यांनी सांगितलं. तमिळनाडूतलं द्रमुक सरकार तमिळनाडूच्याच परंपरांचा अपमान करीत असल्याचा आरोप त्यांनी केला. भाजपाप्रणित केंद्रसरकारच्या काळात झालेल्या

विविध क्षेत्रातल्या सुधारणांची माहिती मोदी यांनी दिली. काँग्रेस आणि द्रमुक यांच्या सद्दीत भ्रष्टाचार बोकाळल्याचा आरोप त्यांनी केला. प्रधानमंत्री मोदी आज केरळमधे २ लोकसभा मतदारसंघांना भेट देऊन निवडणूक प्रचारात सहभागी होतील. कर्नाटकात कलबुर्गी इथं ते आज तर शिवमोगा इथं येत्या सोमवारी -१८ मार्चला जाणार आहेत. २ दिवसांनी ते सालेम आणि कोईमतूरला देखील भेट देणार आहेत. या दौऱ्यादरम्यान ते तेलंगणात विविध जिल्ह्यांमधल्या लोकसभा मतदारसंघांनाही भेट देणार आहेत.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज संध्याकाळी हैदराबाद इथं जागतिक अध्यात्म महोत्सवाचं उद्घाटन करणार आहेत. हैदराबादमधल्या कान्हा शांती वनम् इथं येत्या रविवारपर्यंत हा आध्यात्मिक महोत्सव चालणार आहे. केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयनं श्रीराम चंद्र मिशन आणि इतरांच्या समन्वयानं या कार्यक्रमाचं आयोजन केलं आहे. 'आत्मिक शांती ते जागतिक शांती' ही या महोत्सवाची मुख्य संकल्पना असून धर्म, अध्यात्म विषयक  चर्चा करण्यासाठी देशभरातून आणि परदेशातून ३०० हून अधिक तज्ज्ञ यासाठी एकत्र येत आहेत. या कार्यक्रमाला सुमारे एक लाख लोक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. महोत्सवाचा समारोप उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या उपस्थिती होणार आहे.

**<><><><><>**

देशात सध्या सर्वाधिक परदेशी थेट गुंतवणूक होत असून त्यात अजून वाढ होईल असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी म्हटलं आहे. खाजगी वृत्तवाहिन्यांच्या बैठकीत त्या बोलत होत्या. नागरिकांना मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देणं म्हणजेच त्याच्या हक्कांचं रक्षण असल्याचं त्या म्हणाल्या. कृत्रिम बुद्धीमत्ता किंवा

ड्रोन तंत्रज्ञानासारख्या नव्या युगाची कौशल्यं विकसित करण्यावर केंद्र सरकार भर देत असल्याचं त्या म्हणाल्या.

<><><><><><>

आपल्या सरकारने गेल्या अडीच वर्षात पेट्रोलच्या किंमती लीटरमागे १५ रुपयांनी तर डिझेलच्या किंमती १७ रुपयांनी कमी केल्याची माहिती केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात दिली आहे. इंधनाच्या किंमती कमी करुन नागरिकांना दिलासा दिल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे शाह यांनी आभार मानले आहेत. तेल कंपन्यांनी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात देशभरात प्रतिलिटर २ रुपयांनी कपात केली आहे. नवे दर आज सकाळी ६ पासून लागू झाले आहेत. त्यामुळे मुंबईत आता पेट्रोल १०४ रुपये २१ पैसे तर डिझेलची किंमत ९२ रुपये १५ पैसे असेल.

<><><><><><>

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेला आजपासून नागपूरमधे रेशीम बाग इथं डॉ. केशव हेडगेवार स्मृती मंदिरात प्रारंभ झाला. संघाच्या संकेतस्थळावर २०१७ ते २०२३ पासून प्रतिवर्षी एक लाख पेक्षा जास्त सदस्यत्वासाठी नोंदणीचे अर्ज आले आहेत, अशी माहिती सहसरकार्यवाह डॉ. मनमोहन वैद्य, आज नागपूर मध्ये पत्रकार परिषदेत दिली. सुमारे पंधराशेच्या वर प्रतिनिधी या तीन दिवसीय प्रतिनिधी संमेलनाला उपस्थित राहणार आहेत.

<><><><><><>

बुलडाणा जिल्ह्यात प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेमुळे एका दिव्यांग व्यक्तीला अन्नधान्य मोफत मिळालं त्याचा कुटुंबाला कसा लाभ झाला ...याविषयी लाभार्थी वसंता घारोड म्हणाले.

**होल्ड - वसंता घारोड.......**

**<><><><><>**

इंग्लंड खुल्या बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेमध्ये पुरुष एकेरीत भारताच्या लक्ष्य सेनने अंडर्स अंटोंसेनवर दणदणीत विजय मिळवून उपांत्यपूर्वफेरीत प्रवेश केला आहे. लक्ष्य सेनने अंटोंसेनवर २४-२२, ११-२१, २१-१४ अशी मात केली. भारताच्या पी.व्ही. सिंधूला मात्र महिला एकेरीच्या दुसऱ्या फेरीत पराभव पत्करावा लागला. पुरुष दुहेरीत चिराग शेट्टी आणि सत्विकसाईराज जोडीला इंडोनेशियाच्या बी मौलाना आणि एम एस फिक्री यांच्याकडून पराभव पत्करावा लागला. महिला दुहेरीतसुद्धा अश्विनी पोनाप्पा आणि तनिषा क्रिस्टो यांना पराभव पत्करावा लागला आहे.

**<><><><><>**

१४ व्या हॉकी इंडिया वरिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत घरच्याच मैदानावर खेळणाऱ्या महाराष्ट्र हॉकी संघाचा आत्मविश्वास उंचावला असून काल त्यांनी बलाढ्य दिल्ली संघावर ३-० असा विजय मिळवत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. आंतरराष्ट्रीय हॉकीपटू ऋतुजा पिसाळ तसंच काजल अडपतकर आणि प्रियांका वानखेडे या विजयाच्या शिल्पकार ठरल्या. गतविजेत्या मध्य प्रदेश संघानं सलग विजय नोंदवत उपांत्यपूर्व फेरीतीलं आपलं स्थान पक्कं केलं आहे. याशिवाय झारखंड, बंगाल आणि मणिपूर या संघांनीही काल विजय नोंदवले.

**<><><><><>**

महिला क्रिकेट प्रमिअर लीग २०२४ स्पर्धेत मुंबई इंडियन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु यांच्यात उपांत्य फेरीचा सामना आज संध्याकाळी साडेसात

वाजता दिल्लीतल्या अरुण जेटली स्टेडिअमवर होणार आहे. या सामन्यातल्या विजेत्या संघाचा अंतिम सामना दिल्ली कॅपिटल्स बरोबर येत्या रविवारी होईल.

**<><><><><>**

पुढचे पाच दिवस देशाच्या  मध्य आणि पूर्व भागात वादळी वाऱ्यांसह मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तवली आहे. अरुणाचल प्रदेश, आसाम, मणिपूर मेघालय, त्रिपुरा, नागालँड आणि मिझोराम इथे तुरळक ठिकाणी मध्यम पावसाची शक्यता  आहे, तर झारखंड, ओरिसा, छत्तीसगढ, आणि मध्यप्रदेशाच्या पूर्व भागात येत्या  २० मार्च पर्यंत वादळी वारे, आणि  विजांच्या कडकडाटासह पाऊस पडेल, असा अंदाज आहे. केरळ, माहे, रायलसीमा, तामिळनाडू, पुद्दूचेरी, काराईकल या भागात येते पाच दिवस वातावरणात उष्मा आणि  आर्द्रता जास्त राहील, असं हवामान विभागाने म्हटलं आहे.

**//<><><><><><>//**